**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-३ ■ अंक-१३० ■ गुरूवार, दि. ३ २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.3 ■ Issue -130 ■ Thursday, 3 Aug 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# पत्रकारिता क्षेत्रातील चित्रगुप्त प्रवीण बुरांडे

## वरिष्ठ पत्रकार प्रवीण बुरांडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



छत्रपती संभाजीनगरातील पत्रकारिता क्षेत्रातील महत्त्वपूर्ण तसेच सर्वांच्या वृत्तपत्राची माहिती तसेच त्यांना वेळोवेळी अचूक माहिती देणारे प्रवीण बुरांडे म्हणजे पत्रकारिता क्षेत्रातील चित्रगुप्तच आहेत.

पत्रकारिता क्षेत्रातील महत्त्वपूर्ण नाव म्हणजे प्रवीण बुरांडे २ जुलै रोजी त्यांचा वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात **'अट्टलमत'**च्या कार्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी संपादक मित्र परिवारांचा या छोटेखानी कार्यक्रमात सहभाग होता. प्रवीण बुरांडे यांनी नेहमीच पत्रकारिता क्षेत्रात येणाऱ्या तरूण पत्रकारांना नेहमीच मोलाचे मार्गदर्शन केले आहे.

जनपत्र या वृत्तपत्राच्या माध्यमातून आपल्या मेहनतीच्या जोरावर पत्रकारिता क्षेत्रात स्थान बळकट केले. त्यांनी अनेक महत्त्वाच्या घडामोडींवर धाडसी रिपोर्टिंग करून समाजाला सत्य परिस्थितीची जाणीव करून दिली आहे. त्यांचे लेखन नेहमीच विचारप्रवर्तक आणि सम ाजहितास्पद असते. प्रवीण बुरांडे हे केवळ पत्रकार नाहीत, तर समाजसेवक म्हणून देखील ओळखले जातात. त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे आणि गरजूंना मदत केली आहे. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांनी समाजात आदराचे स्थान मिळवले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

## जनपत्र ते जनमित्र....

## पत्रकारितेतील कर्तव्यनिष्ठतेला मानाचा मुजरा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पत्रकारितेच्या क्षेत्रात आपल्या तळमळीने आणि जबाबदार कामगिरीने ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ पत्रकार प्रवीण बुरांडे यांचा वाढदिवस अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनच्या वतीने अट्टलमत कार्यालयात हा छोटेखानी कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमात प्रवीण बुरांडे यांचा पुष्पगुच्छ, शाल देऊन केक कापून सत्कार करण्यात आला. बुरांडे हे अत्यंत मनमिळावू, सहकार्यशील आणि नेहमी चौकस पत्रकारिता करणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. ते आपलं कर्तव्य प्रामाणिकपणे बजावतात आणि प्रत्येक सहकाऱ्याला साथ देतात. यावेळी त्यांच्याविषयी अनेक पत्रकारांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला असोसिएशनचे अध्यक्ष रतनकुमार साळवे, महाराष्ट्र कार्यकारी अध्यक्ष तथा अट्टलमतचे संपादक, रशपालसिंग अट्टल, महाराष्ट्र संपर्क प्रमुख गणेश पवार, वरिष्ठ पत्रकार कल्याण अन्नपूर्णे, मनीष अग्रवाल, बाजीराव सिंघम, जिल्हाकार्यध्यक्ष प्रल्हाद गवळी, नितीन दांडगे, लक्ष्मण भुतकर, धम्मपाल दांडगे, अंबादास तळणकर व प्रकाश खजिनकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी प्रवीण बुरांडे यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व यशस्वी पत्रकारितेच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.











**अट्टलमत** परिवारातर्फे
**मा.श्री.प्रवीण बुरांडे** यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
संपादक- दै.जनपत्र



दिनेश परदेशी
कार्यकारी संपादक, अट्टलमत